
पतंगगीतं: किती बनली किती बदली?





पतंग बदवण्याचं राज कपूरचं वेड जुनंच

हिंदी चित्रपटात मोजकीच पण स्मरणीय पतंगगीतांवर स्वार होऊन चित्रपटगीतांच्या आकाशात एक विहार.

□ अजित पोपट

हिंदी चित्रपटांत सण-समारंभांचं महत्त्व तसं जास्तच असतं. होळी, दिवाळी, गोकुळाष्टमी वगैरे सणांचा उल्लेख चित्रपटांत या ना त्या कारणाने येत असतो. अनेकदा कथानकाच्या ओघाने तर कधी गाण्यांच्या निमित्ताने. तरीही अनेक लहान-मोठे उत्सव या चित्रपट निर्मात्यांकडून तसे उपेक्षित राहिले. असाच एक सण आहे उत्तरायण किंवा संक्रांत. पतंगांचा उत्सव. मराठी चित्रपटांत हा उत्सव थोडाफार दिसला, पण हिंदीत त्याला म्हणावं तसं महत्त्व मिळालं नाही. त्यामुळे पतंगगीतं किंवा संक्रांतीची गाणी चित्रपटगीतं म्हणून अगदी मोजकीच आढळतात.

अर्थात पतंग उडवण्याचा छंद बऱ्याच कलाकारांना आहे. विशेषतः दिलीपकुमार आणि राज कपूर यांचा पतंगीचा शौक सिने चाहत्यांना परिचयाचा आहे. पण स्वतः निर्माता-दिग्दर्शक असूनही राज कपूरने आपल्या या छंदावर एकही गीत एकाही चित्रपटात दिलं नाही याचं आश्चर्य वाटतं.

गुजराती सुगमसंगीतात अविनाश व्यास यांनी 'का ऽ ई ऽ पो ऽ छे' मुखड्याने एक पतंग गीत लिहिलं. कदाचित त्यावरूनच दोनेक वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या *हम दिल दे चुके सनम*चं पतंगगीत 'का ऽ ई ऽ पो ऽ छे'चा मुखडा उचलला असावा. पतंग, पतंगाचा दोर आणि तो उडवणारा यांची आपल्या आयुष्याशी सांगड घालण्याचा फारच छान प्रयत्न केला आहे. इस्माईल दरबारने या गाण्याच्या संगीतावरही बरीच मेहनत घेतली. असं असूनही *हम दिल दे चुके सनम*चं हे पतंगगीत लोकांच्या फारसं तोंडी बसलं नाही. या चित्रपटातली बाकीची गीतंही चांगली होती हेही एक कारण असू शकतं.

बाकीच्या पतंगगीतांपैकी दोन-चार गीतं स्मरणीय आहेत. त्यातील एक गीत *भाभी* चित्रपटातील आहे. १९५७मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात बलराज साहनी, श्यामा, नंदा, जगदीप, पंढरीबाई, राजा गोसावी वगैरे कलाकार होते. सामाजिक विषयावर बेतलेला हा चित्रपट होता. दिलीप-राज-देव या त्रिकुटाशी टक्कर देऊन जे कलाकार स्वतःच्या प्रतिभेच्या बळावर टिकून होते त्यापैकी बलराज साहनी एक होते. बिमल रॉयचा चित्रपट *दो बिघा जमीन*पासून बलराज साहनीची प्रतिभा उफाळून आली. *भाभी* चित्रपटाचं कथानक टिअर जर्कर म्हणजे रडवणारं होतं. म्हणूनच इंग्रजी साहित्य हा विषय घेऊन एम.ए. झालेल्या बलराज

साहनीने गीतकार राजेंद्र कृष्णना चित्रपटात दोन-तीन हळवी गीतं ठेवण्याबाबत सुचवलं.

ए.व्ही.एम. प्रॉडक्शन्स बॅनरखाली बनलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शक कृष्ण पंजू होते. गीतं अर्थातच राजेंद्रकृष्ण यांची होती. बहुधा राजेंद्रकृष्ण आणि रवी एकत्र काम करत असत. परंतु *भाभी* चित्रपटाच्यावेळी रवी व्यस्त असल्याने त्यांनी या चित्रपटासाठी नकार दिला. पण खुद्द रवीला आश्चर्य वाटावं असं रवीच्या शैलीचं संगीत चित्रगुप्तने दिलं होतं. बलराज साहनींच्या सल्ल्यानुसार राजेंद्रकृष्णने दोन-तीन हळवी गीतं लिहिली. त्यातलं एक होतं –

टाई लगाके माना बन गये जनाब हीरो,
रहे पढ़ाई और लिखाई में तो झीरो झीरो...

दुसरं गीत होतं – जवान हो या बुढिया नन्ही सी गुडीया... आणि आणखी एक गीत होतं – चली चली रे पतंग मेरी चली रे


चली बादलों के पार
हो के डोर पे सवार
सारी दुनिया की सैर कर रही रे...

का कुणास ठाऊक, दिग्दर्शक कृष्ण पंजूंना बाकीची हळवी गीतं आवडली पण पतंगगीत काही फारसं रुचलं नाही. कदाचित या गीताचं मर्म त्यांना समजलं नसावं. ते म्हणाले, 'चल चल...' शब्द असलेली किती गीतं घ्यायची? खरं तर 'चल उड जा रे पंछी के अब ये देश हुआ बेगाना...' थीम साँगप्रमाणे होतं आणि अविस्मरणीय चिंतनशील गीतांपैकी एक होतं. बलराज साहनीने चली चली रे पतंग...चा सरळ इंग्रजी अनुवाद केला आणि तो निर्माता ए.व्ही. मय्यप्पनना ऐकवला. त्यानंतर मय्यप्पन, बलराज आणि राजेंद्रकृष्ण यांनी दिग्दर्शक कृष्ण पंजूंच्या गळी हे गाणं उतरवलं आणि आपल्याला एक चांगलं पतंगगीत मिळालं ही गोष्ट त्यांना पटवून दिली.

तेव्हापासून राजेंद्रकृष्ण - चित्रगुप्तची चांगली जोडी जमली. याच जोडीने आपल्याला म्हणजे चित्रपटसृष्टीला आणखी एक चांगलं पतंगगीत दिलं. १९६०मध्ये एशियाटिक प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली हरगोविंद आणि सूरज प्रकाश या दोन दिग्दर्शकांनी *पतंग* नावाचा एक सामाजिक चित्रपट बनवला. या चित्रपटाचे निर्मातेही दोन होते – हरगोविंद आणि केवल सूरी. चित्रपटात राजेंद्रकुमार, माला सिन्हा, ओमप्रकाश आणि अमरीश पुरीचे मोठे बंधू चमनपुरी होते. या चित्रपटात राजेंद्रकृष्ण चित्रगुप्तच्या जोडीने पुन्हा एकदा कमाल केली. चित्रगुप्तबद्दल बोलावं तेवढं थोडं आहे. त्याने संगीतकार म्हणून संख्यात्मक काम कमी केलं असलं तरी गुणात्मक दर्जा फार वरचा होता.

या चित्रपटात ओम प्रकाशवर एक गीत चित्रित करण्यात आलं होतं. त्याचे बोल फार छान होते. 'ये दुनिया पतंग, नीत बदले ये रंग, कोई जाने ना उडानेवाला कौन है...' चित्रपटात हे गीत दोन भागांत होतं. 'जी'च्या जितुभाई महेतांनी राजेंद्रकृष्णबरोबर या गीतावर बरीच चर्चा केली होती.

त्यावेळी राजेंद्रकृष्णनी या गीताच्या जन्माचा इतिहास सांगितला. त्यांच्या एका गुजराती स्नेह्याकडे मकर संक्रांतीनिमित्त आयोजित



*कटी पतंग*मध्ये आशा पारेख-राजेश खन्ना

मेजवानीला राजेंद्रकृष्ण गेले होते. गच्चीत उभं राहून आकाशात नजर टाकली तेव्हा त्यांना वेगवेगळ्या रंगांच्या पतंगांची एकच गर्दी झालेली दिसली. कोण कुठला पतंग उडवतोय तेच समजत नव्हतं. पतंग आपापसात जणू रंगांची देवाण-घेवाण करत होते. हे पाहून राजेंद्रकृष्णना हे गीत सुचलं. त्यातला चिंतनाचा भाग अजाणतेपणे आला असंही त्यांनी प्रांजळपणे सांगितलं. आणि हो, तुम्हाला आठवत असेल की या गीताचं संगीतही रवीच्याच शैलीत आहे.

आणखी एक पतंगगीत लता मंगेशकरने गायलंय. अमिताभच्या चढत्या काळात आणि राजेश खन्नाची सद्दी संपू लागली होती त्यावेळी प्रदर्शित झालेल्या *कटी पतंग*साठी आनंद बक्षीने लिहिलेलं हे गीतही चिंतनात्मक आहे. आर.डी. बर्मननी स्वरबद्ध केलेल्या या गीताचे बोल आणि चाल दोन्ही अप्रतिम होते. त्या शब्दांचा ताजेपणा आजही कायम आहे:

'ना कोई उमंग है, ना कोई तरंग है
मेरी जिंदगी है क्या, एक कटी पतंग है
आकाश से गीरी मैं, एक बार कटके ऐसे
दुनिया ने फिर ना पुछो
लूटा है मुझको कैसे...'

चित्रपटाच्या नायिकेच्या तोंडी आपबितीचं वर्णन करणारं हे गीत अतिशय मार्मिक होतं. मराठी चित्रपटातही फारशी पतंगगीतं आढळत नाहीत. एक लावणीगीत 'चढा ओढीनं चढवित होते ग बाई मी पतंग उडवित होते...' हे लावणीगीत आजही मराठी रसिकांच्या तोंडी आढळतं. ●

अर्थ १९४७मध्ये आमिर-नंदिता दास

